# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि. २६ एप्रिल २०२३

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २५३/२०२३ भादंविसक ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २३/०४/२०२३ रोजी १९.३० वा ते २१.३० वा चे दरम्यान, जनता बँकेच्या समोरच्या बाजस, सार्वजनिक रोडच्या कडेला, मुरारजी पेठ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २५/४/२०२३ रोजी ००.१२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | मोहीददीन नबीसाब जमखंडी, वय- ५९ वर्षे, रा. घर नं. ४६, तेलंगी पाच्छा पेठ, जमखंडी पुल जवळ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | ३०,०००/- रु एक हिरो स्प्लेंडर प्लस काळया रंगाची त्यावर सिल्व्हर पट्टे असलेली |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची मोटार सायकल क्रं. एम एच १३ डी पी २८९१ ही वरील ठिकाणी हॅन्डल लॉक करुन पार्क केली असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमतीवाचून मुद्दाम लबाडीने चोरुन नेली आहे म्हणून. तपास:- पोहेकॉ/ ४७१ पोळ - ८२०८३४८००६ |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २५४/२०२३ भादंविसक ४०९,४२०,४०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि. २१/०८/२०१८ ते दि. ०६ जानेवारी २०२३ रोजी चे दरम्यान, भारत फायनान्स इनक्लुशन लिमीटेड, साऊथ सोलापूर, अ ब्रँच प्लॉट नं. ०९, यश नगर, मुरारजी पेठ, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि २५/४/२०२३ रोजी ०१.२९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | दादासाहेब अनिल मेटकरी, रा. शनिवार पेठ, मेटकरी गल्ली, मंगळवेढा, जि. सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) सिध्देश्वर परशुराम भिसे, २) मोहन राजेश्याम नल्ला, दोघे- भारत फायनान्स इनक्लुशन लिमीटेड, साऊथ सोलापूर येथील कर्मचारी |
| **फसवणुक र** | | २४,७०,५९६/- रुपये असे |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, मागील आठ वर्षापासुन फिर्यादीचे भारत फायनान्स कंपनीचे एकुण ५ शाखा आहेत. वरील ब्रँच ही ग्रामीण भागातील महिलांचे उपलब्ध असलेले बचतगट टिम मधिल सभासदांना छोटे मोठे उदयोग करणेकरीता कर्ज वाटप करीत असताना त्यांचेकडुन बायोअटेंडन्स घेवून कर्ज पुरवठा केला जात असे. फिर्यादी हे दि. २१/०८/२०१८ ते दि. ०६ जानेवारी २०२३ पर्यंत भारत फायनान्स इनक्लुशन लिमीटेड येथे ब्रँच मॅनेजर या पदावर कार्यरत आहेत. त्यातील आरोपीत क्रं. १ हे संगम मॅनेजर( फिल्ड ऑफिसर) या पदावर दि. ०१/०२/२०२१ पासुन ते दि. १२/१०/२०२२ पर्यंत फिर्यादीच्या शाखेत कार्यरत होते. दि. १२/१०/२०२२ रोजी आरोपीत क्रं. १ यांनी भारत फायनान्स लिमीटेड साऊथ सोलापूर बी येथे बदली झाली होती. परंतु फिर्यादीचे शाखेत त्यांचे जागी काम करणारे कोणी कर्मचारी उपलब्ध नसल्याने फिर्यादीने अंबादास बुधराम यांना फोन करुन सांगितले की आरोपीत क्रं. १ याने त्यांचे शाखेमध्ये गैरव्यवहार केला आहे. तुमच्या शाखेमध्ये त्यांचे व्यवहार तपासुन घ्या असे सांगितल्याने फिर्यादीने त्यांचे शाखेतील सुनिल जगदाळे डिव्हीजनल मॅनेजर, पापुलाल पठाण, सी आर एम, नागनाथ चाबुकस्वार युनिट |

| | | |
|---|---|---|
| | | मॅनेजर, राजेश फडतरे क्राईसेस मॅनेजर अशी टिम नियुक्त करुन फिर्यादीचे शाखेमधुन आरोपीत क्रं. १ शाखेत रुजु झाल्यानंतर ते दि. २६/११/२०२२ पर्यंत ग्रामीण भागातील महिलांना किती कर्ज मंजुर केले आहे व सदर कर्जाचे आठवडा हप्ते हे फिर्यादीच्या शाखेमध्ये परत फेड म्हणून किती जमा होतात याची खात्री केली असता, आरोपीत क्रं. १ याने ७३ महिलांना छोटे मोठे उदयोग करण्याकरीता कर्ज मंजुर करुन देखील सदर कर्जाचे पैसे न देता त्याने आरोपीत क्रं २ याचे आधार इनेबल्ड पेमेंट सिस्टम या मशिनवरुन पैसे कर्जदाराचे खात्यावरुन काढुन घेतले आहेत असे निदर्शनास आले. त्यानंतर सदर ज्या सभासदांची फसवणुक झाली आहे असे सभासदांकडुन लेखी स्वरुपात तक्रारी अर्ज घेतले. त्यानंतर फिर्यादीने आरोपीत क्रं. १ याचे कडे चौकशी केली असता, त्याने मी काहीही केलेले नाही, मला त्याबाबत माहिती नाही असे सांगितले. त्यानंतर फिर्यादीने ग्रामीण भागातील ज्या ज्या सभासदांची फसवणुक झाली आहे असे सभासदांचे स्टेटमेंट काढले असता, फिर्यादीस असे निदर्शनास आले की आरोपीत क्रं. २ याचे नावावरील आधार इनेबल्ड पेमेंट सिस्टम या मशिनवरुन पैसे कर्जदाराचे खात्यातुन काढुन घेतल्याचे दिसत आहेत. सदर बाबत आरोपीत क्रं. २ यास विचारणा केली असता, त्याने आरोपीत क्रं. १ याचे सांगणेवरुन सभासदांचे पैसे काढुन त्यास नेवून देत होता असे सांगितले. त्यानंतर फिर्यादीने आरोपीत क्रं. १ याचे सांगणेवरुन पैसे काढुन सभासदांचे पैसे परस्पर त्यांचे खात्यावरुन कसे काय काढत होता असे विचारले असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. यावरुन फिर्यादीची खात्री झाली की भारत फायनान्स इनक्लुशन लिमीटेड कंपनीमध्ये असलेल्या आरोपीत क्रं. १ स्वतःच्या पदाचा दुरुपयोग करुन त्याचे साथीदार आरोपीत क्रं. २ याचेशी संगनमत करुन कंपनीच्या एकुण ७३ कर्जदार सभासदाचे विश्वास संपादन करुन एकुण २४,७०,५९६/- रु ची फसवणुक केली आहे म्हणून. तपासः- पोनि - देशमुख - **९४२१०८५८८८** |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | २४८/२०२३ भादंविसक ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि. २५/११/२०१८ रोजी लग्नानंतर दोन महिन्यांनी ते दि. २५/०७/२०२२ रोजी चे दरम्यान, गंजगोलाई आजमगंज मस्जिद च्या पाठीमागे, लातुर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि २५/४/२०२३ रोजी १८.५७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | सौ. नेहा नियामतअली सय्यद, वय- २३ वर्षे, रा. गंजगोलाई आजमगंज मस्जिद च्या पाठीमागे, लातुर, सध्या- सरवदे नगर, हैद्राबाद नाका, नवाज फंक्शन हॉलच्या जवळ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | १) नियामत अली सय्यद- पती, २) अकबर अली सय्यद- सासरे, ३) मुमजात सय्यद- पत्नी, ४) सिपटन अकबरअली सय्यद- दिर, सर्व रा. गंजगोलाई आजमगंज मस्जिद च्या पाठीमागे, लातुर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील वरील आरोपीतांनी फिर्यादीचे लग्नानंतर दोन महिन्यांनी वेळोवळी संगनमत करुन माहेरुन घर जागा विकत घेण्याकरीता व त्याचे बांधकाम करण्यासाठी १० लाख रुपये घेवून ये तेव्हाच तु नांदण्यास ये असा तगादा लावून, फिर्यादीच्या चारित्र्यावर संशय घेवून, मारहाण शिवीगाळ, दमदाटी करुन शारिरीक व मानसिक त्रास देवून छळ केला आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ १०७२ चव्हाण - ९८२३०१९३२६ |

# एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | **:** | २४९/२०२३ भादंविसक ३७९ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | **:** | दि २०/०४/२०२३ रोजी १०.३० वा ते १२.०० वा चे दरम्यान, गुड्डु कारखान्याच्या समोर सार्वजनिक रोडवर, सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | **:** | दि २५/४/२०२३ रोजी २२.२३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | **:** | अतिश रामकृष्ण देवकुळे, वय- ३२ वर्षे, रा. झोपडपट्टी धुम्मा वस्ती, लक्ष्मी पेठ, सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | **:** | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | २५,०००/- रु एक हिरो कंपनीची फॅशन एक्स लाल काळया रंगाची मोटार सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीची वरील वर्णनाची मोटार सायकल क्रं. एम एच १३ डी डी ०४८० ही वरील ठिकाणी हॅन्डल लॉक करुन पार्क केली असता, कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे संमतीवाचून मुद्दाम लबाडीने चोरुन नेली आहे म्हणून. तपासः- पोहेकॉ/ १२६६ भांगे - ९९२३८८०६१ |